MHPA020022982022

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१०३४/२०२२</u>
<u>इलाही खान वि. निरंक</u>

## <u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज, मुंबई विनियमन (Regulation) अधिनियम कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदाराचे अर्जातील कथन असे आहे की, अर्जदार इलाही खान पिता युनुस खान यांची आई नामे रहिमुनिसा बेगम भ्र. युनुस खान ह्या दिनांक ०२.११.२०१० रोजी परभणी, ता.जि.परभणी येथे मयत झाले. मयताच्या पश्चात अर्जदार हा मयताचा एकमेव कायदेशीर वारस आहे व त्यांच्या शिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदाराने तो मयताचा कायदेशीर वारस म्हणून ओळखण्याकरीता त्याला वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदाराने अर्ज मंजूर करुन अर्जातील मयाताच्या नावे असलेली नमुद स्थावर मिळकत गट नं.४५९, ०३ हे ३२ आर, मौजे लोहगाव, ता.जि.परभणी चा फेरफार अर्जदराच्या नावाने घेण्यसाठी वारसा प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात देण्याची विनंती केली आहे.

**०३.** अर्जदारांच्या मागणीबाबत जाहीर प्रगटन (निशाणी ११) प्रसिध्द होऊनही अद्याप पावेतो कोणीही या अर्जास हरकत, आक्षेप नोंदविलेला नाही.

**०४.** अर्जदाराने त्यांच्या अर्जातील कथनाच्या समर्थनार्थ निशाणी क्र.८ वर शपथपत्र दाखल करुन त्यांचा स्वत:चा साक्षीपुरावा नोंदविला. तसेच, नि.क्र.१२ वर मयत रहिमुनिसा बेगम यांचे मृत्यु प्रमाणपत्र, नि.क्र.१३ वर मौजे लेहगाव येथील गट क्र.४५९ चा ७/१२ उतारा, नि.क्र.१४ वर अर्जदारांच्या आधार ओळखपत्राची पडताळणी केलेली प्रत व नि.क्र.१५ व मयताच्या निवडणुक ओळखपत्राची पडताळणी केलेली प्रत दाखल करून पुरावा बंद केल्याची पुरसीस (नि.क्र.१६) दाखल केली आहे.

**०५.** मी अर्जदारांच्यावतीने ॲड.एम.ए.मुबीन यांचा युक्तीवाद असा युक्तीवाद केला की, सदरचा अर्ज अर्जदार हे मयताचे नाममात्र वारस आहेत असे घोषीत करून मयाताच्या नावे असलेली नमुद स्थावर मिळकत गट नं.४५९, ०३ हे ३२ आर, मौजे लोहगाव, ता.जि.परभणी चा फेरफार अर्जदराच्या नावाने घेण्यसाठी वारसा प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात देण्याची विनंती केली आहे व अभिलेखावरील कागदपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

**०६.** अर्जदाराचा अर्ज, अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेला कागदोपत्री पुरावा आणि

त्यांचे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात, व त्यापुढील निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या करणांकरिता मांडत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार मागणी प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**०७.** अर्जदारास वारसाप्रमाणपत्राच्या आधारे मयताची मिळकत त्यांच्या हक्कात किंवा नावाने करून घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. वारसा प्रमाणपत्र मयाताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करण्यासाठी उपयोगात घेता येते. माननीय मुबई उच्च न्यायालयांने ***ॲलायसीस मॅनुअल डिसुझा व इतर विरूध्द मॅरी कमला विल्यम मॅनुअल डिसूझा, २००६ (मुंबई) सी.आर. ५६*** मध्ये मांडलेले निरीक्षण असे आहे की, वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जात न्यायालयाला मयाताच्या मिळकतीवरील वारसांचा अधिकार ठरविण्याची गरज नसुन फक्त अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबत घोषीत करावे. अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र वितरीत केले म्हणजे मयताच्या मिळकतीवर वारसांचा हक्क निर्माण होतो असा अर्थ होत नाही किंवा मयताच्या मिळकतीमध्ये एखाद्याचा अधिकार हिराऊन घेतल्या जात नाही.

**०८.** तसेच, माननीय उच्च न्यायालय मुबई यांनी ***गणपती विनायक आचवल, २०१४(६), एमएच.एल.जे. ६८३*** मध्ये नोंदविलेले निरीक्षण असे की, वारसा प्रमाणपत्र दिले म्हणजे अर्जदारास मयताचे सर्वाधिकार प्राप्त होत नाहीत. वारसा प्रमाणपत्र मंजुर झाले म्हणजे अर्जदार हे मयताचे केवळ प्रतिनिधीक वारस असल्याचे घोषीत होते. वारस प्रमाणपत्र मंजुरी हे केवळ वारसांची विद्यमान स्थिती असल्याचे औपचारीक घोषणा असते किंवा मृत्युपत्राचा व्यवस्थापक किंवा कायदेशीर प्रशासक हे न्यायालयाच्या आदेशा शिवाय मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करू शकतात.

**०९.** असे असतांना एखादा व्यक्ती मुबई विनियमन अधिनियम–VIII च्या नियमानुसार एखादा व्यक्ती पुढील परिस्थीतीमध्ये वारसाप्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे–१.जर त्याची वारसा प्रमाणपत्र मिळण्याची इच्छा असेल तर, २.जर वारस म्हणुन त्याच्या अधिकाराबाबत काही वाद असेल तर किंवा मयताच्या नावे असलेली मिळकत ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीला विश्वासात घेवुन मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करावयाचे असल्यास वारसा प्रमाणपत्राची

मागणी करू शकतो. सदरील प्रकरणामध्ये अर्जदाराने वारसा प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

**१०.** अर्जदार यांनी शपथपत्राद्वारे दिलेला पुरावा व दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्या वरुन, अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे सिध्द होते. तसेच, अर्जदार ही मयताची वारस असल्याबद्दल प्रकरणात कोणाचाही आक्षेप आला नाही. त्यामुळे, अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे अर्जदार हे मयताच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन खालील आदेश पारीत करतो.

**आदेश**

०१. अर्ज अशत: मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार इलाही खान युनूस खान हे मयत रहिमुनिसा बेगम भ्र. युनुस खान यांचे अर्जातील मागणीनुसार कायदेशीर वारस आहेत असे नाममात्र घोषित करण्यात येते.

०३. मुंबई विनियमन (Regulation) अधिनियम कलम ३ व ८ प्रमाणे अर्जदाराकडून विहीत न्यायालयीन शुल्क घेवून वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यात यावे.

CHETANKUMAR UTTAM TELGAONKAR
Digitally signed by CHETANKUMAR UTTAM TELGAONKAR
Date: 2022.12.02 16:49:11 +0530

दिनांकः ०२/१२/२०२२.

**(चेतनकुमार उ. तलगावकर)**
सहावे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**परभणी.**